श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

ऑक्टोबर २०२३ | वर्ष – ११ अंक – १० | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने १२

## डेरवण येथे शास्त्रीय सल्लागार समितीच्या बैठकीत विचारमंथन



*डावीकडून : श्री. जयंतकुमार बांठिया, डॉ. मानसिंगराव घाटगे, डॉ. सुनील नाडकर्णी, श्री. बाळासाहेब काजरेकर, प्रा. चंद्रशेखर गर्दे, डॉ. श्रीपाद बाणावली, श्री. विकासराव वालावलकर, श्री. अशोकराव जोशी, डॉ. अनिल काकोडकर, डॉ. अरविंद नातू, डॉ. ऋता मुल्हेरकर, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. पुष्पा बुरुटे, डॉ. ज्योती अय्यर, डॉ. नीलम शिरसाट, प्रा. नेहा देशपांडे, सौ. शरयू यशवंतराव*

वालावलकर रुरल मेडिकल कॉलेजच्या 'सायंटिफिक ॲडव्हायझरी कमिटी' म्हणजे शास्त्रीय सल्लागार समितीची स्थापना २०१६ साली झाली. आणि त्याचा मूळ उद्देश असा होता की शास्त्रीय विषयातल्या संशोधनाला गती मिळावी आणि खेडेगावातल्या लोकांच्या ज्या अडचणी आहेत त्या शास्त्रीयदृष्ट्या सोडवण्यासाठी या कमिटीतल्या शास्त्रज्ञांचं मार्गदर्शन मिळावं जेणेकरून इथल्या लोकांचं आयुष्य सुखकर होईल. ह्या वेळी ह्या समितीची मीटिंग डेरवणला होती आणि त्यासाठी डॉ. अनिल काकोडकर, चेअरमन आणि सर्व सदस्य उपस्थित होते. डॉ. अनिल काकोडकर यांनी आपले विचार व्यक्त करताना सुरुवातीलाच असं म्हटलं, '' या कमिटीच्या मीटिंगसाठी आम्ही ज्या वेळी इथे येतो त्यावेळी आम्हाला या संस्थेचे एक वैशिष्ट्य असं जाणवतं की सगळ्या आजूबाजूच्या खेडोपाड्यातील सर्वांना सामावून घेऊन सर्वसमावेशक असं काम इथे चालू आहे. आणि जे काही ही समिती मार्गदर्शन करते किंवा सुचविते, अगदी काळजीपूर्वक त्याच्यावर लक्ष देऊन त्या सगळ्या योजना किंवा ते कार्यक्रम पुढे निभावले जातात आणि हे असं ध्येय आणि उद्दिष्ट ठेवून ते केलं जातं आणि त्याच्यावर विचारपूर्वक कार्यवाही केली जाते म्हणून मला इथे यायला आवडतं आणि या सगळ्या मागे जे इन्स्पिरेशन आहे ते ऑफकोर्स काका महाराजांचं आहे आणि त्यामुळे व्यवस्थित फॉलोअप होतो हे ह्या कमिटीचं आणि कॉलेजचं वैशिष्ट्य आहे.''

कामकाजाला सुरुवात झाल्यावर समितीसमोर वैद्यकीय महाविद्यालयातील काही प्राध्यापकांनी आपले प्रबंध मांडले आणि आपलं जे संशोधन चालू आहे त्याचं प्रेझेन्टेशन केलं. त्यामध्ये प्रमुख संशोधन होतं ते 'डेरवण कोहोट' या विषयावरील. हा कोहोट 'किशोरी अवस्था आणि पुढे होणारा मधुमेह' या विषयावर आहे. आणि त्याच्यामध्ये लहानपणी होणाऱ्या कुपोषणातून पुढे मोठेपणी



*वैद्यकीय महाविद्यालयातील कॉन्फरन्स हॉलमध्ये सायंटिफिक ॲडव्हायझरी कमिटीची बैठक*

मधुमेह, ब्लड प्रेशर, हार्ट अटॅक यांना कसं सामोरं जावं लागू शकतं याचा दुवा कसा आहे हे विस्तृतपणे समजावून सांगणारं आणि त्याचे पुरावे सादर करणारं एक प्रेझेंटेशन केलं गेलं. त्यामध्ये सोळा ते एकोणीस वयोगटातील पंधराशे किशोरी मुली निवडून (चिपळूण, खेड आणि संगमेश्वर या तालुक्यातील पाचशे प्रत्येकी) अशा मुलींच्या तपासणीचे सगळे परिणाम/निष्कर्ष सादर केले गेले आणि त्यामध्ये या मुलींमध्ये व्हिटॅमिन डी, व्हिटॅमिन बी १२, कॅल्शियमची कमतरता आढळली आणि रक्तामध्ये 'होमोसिस्टीन' नावाचा घटक खूप जास्त आढळला जो पुढे हार्ट अटॅकला कारणीभूत होऊ शकतो. त्याचबरोबर जवळजवळ ३९ टक्के मुलींमध्ये मधुमेहाची पूर्वलक्षणं दिसली. अशा प्रकारचा डेटा मांडण्यात आल्यावर ह्या मुलींना कोणत्या प्रकारचं इंटरवेंशन किंवा कोणत्या प्रकारचं पौष्टिक अन्न आणि जीवनपद्धती देता येईल जेणेकरून पुढची ही सगळी जोखीम कमी करता येईल याबद्दल या मीटिंगमध्ये चर्चा झाली. या समस्येवर डॉ. अनिल काकोडकर, डॉ. रामस्वामी आणि जयंत कुमार बांटिया यांनी आपल्या महत्त्वाच्या सूचना दिल्या.

त्यांनी असंही सांगितलं की कदाचित लहान मुलांपासूनच मधुमेहाचं स्क्रीनिंग हे 'पॉलिसी' म्हणून सरकारने करणं हे आता गरजेचं होऊ शकतं का ह्यावर आपल्याला विचार करायला हवा. आशिया खंडातील लोकांमध्ये कुपोषणामुळे होणारा जो मधुमेह आहे तो एक वेगळ्या प्रकारचा, अट्रॉफ नेचर आहे, अशी एक प्रकारची एक स्ट्राँग केस तयार करून आपण ICMR किंवा अशा ज्या गव्हर्नमेंटच्या मोठमोठ्या फंडिंग एजन्सीज आहेत, आणि आय.सी.डी.ए. यांच्यासमोर मांडू शकतो का? 'आय.सी.डी.ए.' शी त्याचं कोलॅबरेशन करून आपण लहानपणापासूनच हे मधुमेहावर जनजागृती आणि स्क्रीनिंग करू शकतो का यावर विचार करणं आता आवश्यक झालेलं आहे.

लहानपणीचे कुपोषण आणि प्रौढ अवस्थेतील मधुमेह यातील दुवा जोडण्यासाठी याच्यामध्ये काही गुणसूत्रांचाही भाग येतो का? आणि जिनॉमिक्स आहेत का हे पडताळण्यासाठी 'ह्यूमन जिनोम' हा 'आयसीएमआर'चा जो प्रोजेक्ट आहे त्यात आपण सहभागी होणं आवश्यक आहे आणि त्यासाठी आपल्याला 'जिनोम इंडिया' ह्या प्रोजेक्टशी संपर्क करून त्यांच्याकडून काही अभिप्राय घेणं आणि त्यात आम्हाला सहभागी करून घेता का? अशा प्रकारे त्यांना एक प्रपोजल देणंही आवश्यक आहे. या प्रोजेक्ट करिता जी वेगवेगळी कोलॅबरेशन्स झालेली आहेत, जसं TIFR ची एक ब्रँच ARMUDA, त्याचे डॉ. उल्हास आणि डॉ. महेंद्र सोनवणे तसेच सीएमसी वेल्लोरचे डॉ. निहाल थॉमस, केईएम पुण्याचे डॉ. याज्ञिक यांच्याबरोबर आपण अशा प्रकारे कोलॅबरेशन करत आहोत आणि त्यांच्या ह्या मार्गदर्शनामुळे डायबिटीसमधील फिजिओलॉजी, यातलं जिनॉमिक्स, त्यातलं प्रेग्नन्सीमध्ये होणारा डायबिटीस याच्यात हळूहळू ते कसं उलगडत जाणार आहे, ही फिजिऑलॉजी आपल्याला समजणार आहे. त्यांचं बॉडी कंपोझिशन, त्याच्यासाठी लागणारे डीटीओ वापरून केलेलं जाणारं बॉडी कंपोझिशन, अशा अनेक प्रकारचे अभ्यास केले जाणार आहेत याची माहिती डॉक्टर सुवर्णा पाटील यांनी सर्व कमिटी मेंबर्सना दिली. आणि त्यावर कमिटी मेंबर्सनी आपलं त्या विषयीचं मत व्यक्त केलं.

जयंतकुमार बांटिया यांनी असंही सुचवलं की आपल्याकडे फॅमिली हेल्थ सर्व्हे होतात. सेवाग्राममध्ये मोठ्या प्रमाणावर गावं अडॉप्ट केली जातात. त्याप्रमाणे आपल्या विद्यालयातही फॅमिली सर्व्हे होत असतात. खेडेगावांमध्ये अशा कुटुंबांना अडॉप्ट करून त्यांच्यामध्ये आपण मधुमेह, हायपरटेन्शन, हार्ट अटॅक, त्यांचं वजन, उंची याचं सर्वेक्षण करू शकतो आणि त्याच्यातून आपल्याला भरपूर काही माहिती या खेडेगावातल्या लोकांच्या आरोग्याबद्दल मिळू

शकते.

सर्पदंशावरही वालावलकर रुरल मेडिकल कॉलेजने आबासाहेब गरवारे इंजिनियरिंग कॉलेजच्या कॉम्प्युटर सायन्सच्या विद्यार्थ्यांची मदत घेऊन डॉ. नेहा देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली एक स्नेक बाईट सॉफ्टवेअर डेव्हलप केलेलं आहे त्याची माहिती डॉक्टर सुवर्णा पाटील यांनी कमिटी मेंबर्सना दिली.

बायोकेमिस्ट्रीचे प्राध्यापक डॉक्टर अरविंद यादव यांनी मेडिकल स्टुडंट्स आणि उच्च पदवी शिकणारे जे मेडिकलचे विद्यार्थी आहेत त्यांनी हाती घेतलेले वेगवेगळे प्रबंध आणि प्रोजेक्ट्स आहेत त्याबद्दल माहिती दिली. त्यावर आपलं मत मांडताना डॉ. काकोडकर यांनी सुचविले की ग्रामीण भागातील लोकांच्या काय अडचणी आहे त्याची एक यादी तयार करा आणि ती या मुलांसमोर ठेवा म्हणजे आणि त्यातून त्या मुलांनी जर ते प्रोजेक्ट शोधले आणि त्याच्यावर संशोधन सुरू केलं तर या सर्व संशोधनाला एकत्रितपणे गती येईल आणि त्याची दिशा एक राहील आणि त्यामुळे त्यांच्या ज्या अडचणी आहेत त्या दूर होण्यासाठी आणि त्याच्या मागचं कारण उलगडण्यासाठी याचा फायदा होईल.

टी. रामास्वामी यांनी संस्थेचे मनापासून आभार मानले की अशा प्रकारची एक संस्कृती या संस्थेने निर्माण केली आणि केवळ दहा वर्षांत या संस्थेला हे साध्य करता आलं आणि ज्या प्रकारचे संशोधन इथे चालू आहे आणि वेगवेगळं डेटा कलेक्शन जे येथे घडत आहे आणि वेगवेगळे चॅलेंजेस म्हणजे खेडेगावातल्या लोकांच्या अडचणी दूर करण्यासाठी ज्या प्रकारे संशोधन इथे चालू आहे त्यासाठी अजून एक मोठा संघ उभारणे आणि मग त्याच्यातून या खेडेगावातल्या लोकांच्या समस्यांवर उपाय शोधणे याची गरज आहे. जे काम आता दहा वर्षांत झालेलं आहे त्याबद्दल त्यांनी संस्थेचं कौतुक केलं.

डॉ. रिटा मुल्हेरकर, डॉ. सुनील नाडकर्णी यांनी केलेल्या संशोधनावर 'प्लेटलेट लायझेट' म्हणजे 'प्लेटलेट' पासून 'बोवाईन अल्बूमिन' तयार करणं हा जो प्रोजेक्ट आहे त्याच्यासाठी ज्या तांत्रिक अडचणी आहेत त्यावर त्यांच्याबरोबर चर्चा झाली आणि त्यातून आपल्याला कसा मार्ग काढता येईल आणि हे कसं मार्केटमध्ये आणता येईल यावर विशेषतः भर दिला गेला. त्यानंतर डॉक्टर नाडकर्णी यांनी हायड्रोजन पेरॉक्साईड म्हणजे ओझोन वापरून किंवा अतिशय कमी पाण्यात किंबहुना पाणी न वापरता आपण एखादी वस्तू कशी ड्रायक्लिनिंग करू शकतो किंवा एखादं कापड मळलेलं कसं ड्रायक्लिनिंग करू शकतो आणि पुढे जर संभाव्य दुष्काळ पडला तर त्या वेळी याचा कसा वापर होईल, यावर त्यांचं संशोधन कशा प्रकारे मदत करेल याबद्दल त्यांना माहिती दिली.

डॉ. नीलम शिरसाट यांनी आपल्या संशोधनाबद्दल बोलताना जिनॉमिक्स आणि सिंगल न्यूक्लियोटेड पोलिमॉरफिजम यामध्ये छोटे छोटे होणारे बदल आणि त्या बदलांमुळे होणारा आजार यावर विस्तृत माहिती देताना डेरवण कोहोट आणि कॅन्सर यावर दोन विषयांवर आपलं संशोधन विस्तृतपणे पुढे मांडलं आणि हे संशोधन पुढे नेण्यासाठी कोणत्या प्रकारच्या उपाय योजना कराव्या लागतील आणि त्यासाठी कोणत्या कोणत्या प्रकारची उपकरणं लागतील यावर चर्चा झाली आणि त्यातून पुढे नेण्यासाठी ह्या 'जिनॉमिक्स लॅब'ची स्थापना करणं आणि त्यातून पुढे गुणसूत्रांचा अभ्यास सुरू करणं हे किती आवश्यक आहे यावर चर्चा झाली.

डॉ. ज्योती अय्यर यांनी आपल्या प्रेझेंटेशनमध्ये सांगितले की 'डेरवण कोहोट' हा एक किशोरवयीन मुलींचा कोहोट आहे आणि येथे पुढे वीस वर्षं किशोरवयीन मुलींच्या आरोग्याबद्दल विस्तृत माहिती आणि त्याचे अॅनॅलिसिस आणि त्यांची ऍनथ्रोगोमेट्री याचं रेकॉर्ड ठेवले जाणार आहे. याकरता त्यांच्यात जे दोष आहेत ते निवारण्यासाठी न्यूट्रिशन सपोर्ट तसेच त्याच्यामागचं सायन्स आणि त्याच्यामागचं जिनॉमिक्स शोधण्याची गरज आहे. या न्यूट्रिशनसाठी कोणकोणत्या संस्थांशी आपण कोलॅबरेट केलं याची माहिती त्यांनी दिली. त्यामध्ये 'टॉडलर फूड' ही अमेरिकन संस्था आहे. त्या संस्थेमध्ये 'आय.आय.टी.'चे ॲलम्नी डॉ. शिवराम मूर्ती आणि 'आर.जी.एस.टी.'चे सेक्रेटरी डॉ. नरेंद्र शहा आणि डॉ. अलका जाधव या आपल्याला मदत करणार आहेत आणि त्यातून त्वरीत वापरण्याजोगी उत्पादने या मुलींनी तयार करणं आणि ती स्वतः सेवन करणं आणि त्यातून कुपोषणावर मात करणं याच्यासाठी मदत करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे किचन गार्डन आणि स्वतः च्या दारात भाज्या, आणि वेलभाज्या पिकवणं, धान्य पिकवणं यासाठी 'बांबू पॉली हाउस' निर्माण करणे आणि त्याचं ट्रेनिंग देणं याच्यासाठीही आपण सहकार्य करत आहोत. आणि इथे त्या ट्रेनिंगसाठी दापोली कृषी विद्यापीठ आणि टॉडलर फूड पार्टनर या दोन संस्था आपल्याला मदत करणार आहेत याबद्दलही माहिती देण्यात आली.



*डॉ. ज्योती अय्यर सादरीकरण करताना*

# दिलखुलास गप्पा – एका द्रष्ट्या अणुयात्रिकाशी !




*डॉ. अनिल काकोडकरांशी संवाद साधताना, डावीकडून : अक्षया तांदळे, अविनाश माने, अथर्व देशपांडे*

दिनांक ७ ऑक्टोबर २०२३, स्थळ : लेक्चर हॉल क्र. ४,. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, सावर्डे/ डेरवण; वेळ : दुपारी ४.३० ते ५.१५ दरम्यानची.

असा रुक्ष अहवाल सांगितल्यास कोणालाही ह्या दरम्यान जे घडले त्या संस्मरणीय घटनेचं महत्त्व सहजासहजी लक्षात येणार नाही. 'Scientific Advisory Committee'च्या चर्चासत्रासाठी सर्व परिसर एका अनोख्या चैतन्याने उजळून निघाला होता. श्री. जयंतकुमार बांठिया (माजी प्रमुख सचिव, महाराष्ट्र शासन), डॉ. श्रीपाद बाणावली (शैक्षणिक अधिष्ठाता, टाटा मेमोरियल रुग्णालय समूह) अशा एकाहून एक श्रेष्ठ प्रभृतींच्या पदस्पर्शाने संपूर्ण रुग्णालय आणि महाविद्यालयातील कर्मचारीवृंद जणूकाही तल्लीन झाल्यासारखा कामं करत होता. परंतु ह्या सर्व शास्त्रीय सल्लागार समितीचा सुकाणू ज्या व्यक्तीच्या हाती आहे, त्याच व्यक्तीचा वर उल्लेखलेल्या ठिकाणी वैद्यकीय (Medical), भौतिकोपचार (Physiotherapy) आणि परिचारिका (नर्सिंग ) महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांशी संवाद आयोजित करण्यात आला होता, त्याचाच हा वृत्तांत. ही व्यक्ती कोण असेल हे डेरवण वार्तापत्राच्या सर्व नियमित वाचकांना लक्षात आलेच असेल, ही व्यक्ती आहे पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर.

महाविद्यालयाच्या मृद्गंध ह्या सांस्कृतिक व कलामंचातर्फे आयोजित करण्यात आलेल्या सदर संवादाचे शीर्षक होते : Smiling Buddha, Operation Shakti, What NEXT on the Path towards Aatmanirbhar Bharat?.

अक्षया तांदळे, अथर्व देशपांडे आणि अविनाश माने या आंतर्वासिता प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी (Internsनी ) डॉ. काकोडकरांशी संवाद साधताना नानाविध विषयांना स्पर्श करत त्यांचा जीवन प्रवास, त्यांचं अनुभव विश्व, नव्या भारताच्या संकल्पना असा विस्तृत पट उलगडला. १९७४ सालचे आणि १९९८ सालचे पोखरण येथील अणुविस्फोटामागची भौगोलिक व राजकीय समीकरणे ऐकताना सर्व उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः रोमांच उभे राहिले. ह्या दोन्ही प्रयोगांच्या वेळी स्वतः योजनेचा भाग असलेले डॉ. काकोडकर यांच्या मुखातून हा सर्व कालखंड उलगडत जाताना बदलत्या भारताचे चित्र आपोआप उलगडत





*डावीकडून : अविनाश माने, डॉ. अनिल काकोडकर, अथर्व देशपांडे आणि अक्षया तांदळे,*

गेले. City in a Village अर्थात सिलेज ह्या त्यांच्या संकल्पनेचा आवाका त्यांच्याचकडून ऐकताना त्यांच्या विद्वत्तेचा, प्रखर तेजाचा अनुभव सर्वांनीच घेतला. स्वास्थ्यसेवा क्षेत्राचे योगदान काय असावे हे सांगताना त्यांनी मांडलेले अनेक पैलू अंतर्मुख होऊन चिंतन करण्यासारखे होते. जेव्हा डॉ. काकोडकरांना विचारण्यात आले की आपल्या एकेका निर्णयावर आपल्या देशाचे भविष्य अवलंबून आहे अशा प्रचंड ताणतणावातसुद्धा तुम्हाला तुमचे स्वास्थ्य आज वयाच्या ८०व्या वर्षांपर्यंत कसे काय राखता आले? त्यावर त्यांनी अगदी सहज उत्तर दिले की : तुमचे तुमच्या कामावर प्रचंड प्रेम, निष्ठा असेल तर आपल्या आवडत्या कामासाठी आपले स्वास्थ्य जपले पाहिजे. ह्यासाठी वेगळी मेहनत करावीच लागत नाही. श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज् ट्रस्ट आणि भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय ह्यांच्याशी तुमचे नाते कसे जुळले हे जेव्हा डॉ. काकोडकरांना विचारण्यात आले तेव्हा त्यांनी आपसूक एक गोष्ट उलगडली, ते म्हणाले की मी इथे पहिल्यांदा आलो तेव्हापासून मी जेव्हा येथे येत गेलो तेव्हा तेव्हा मला एक गोष्ट प्रकर्षाने कायम जाणवत गेली की, ह्या जागेमध्ये काहीतरी विलक्षण वेगळेपण आहे आणि त्यामुळेच मला इथे कायम यावे वाटते, निगडित राहावेसे वाटते.

समारोपाचे आभारप्रदर्शन करताना 'मृद्गंध'चे मार्गदर्शक व शरीरक्रियाशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. अद्वैत गोडसे म्हणाले की संपूर्ण संवादादरम्यान डॉ. काकोडकर ह्यांच्या व्यक्तिमत्त्वातून एक शांत, निगर्वी भाव पाझरत होता. त्यावरून मला फक्त एकच सुचते की 'सुखदुःखे समे कृत्वा, लाभालाभौ जयाजयौ।' ही भगवद्गीतेतील पंक्ती जर मनुष्यरूपात आज कोणाला बघायची असेल तर डॉ. काकोडकर यांच्या रूपात ती दिसेल.

ह्या हृद्य समारंभासाठी श्री. विकास वालावलकरसाहेब, डॉ. श्रीपाद बाणावली, श्री. जयंतकुमार बांठिया, वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. नेताजी पाटील तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होता. कार्यक्रमाच्या दरम्यान डॉ. अविनाश वाघमोडे आणि डॉ. लक्ष्मण फड ह्यांच्या मार्गदर्शनाखाली उदयसिंह रौतेले ह्या विद्यार्थ्याने काढलेल्या sketchचे डॉ. काकोडकर यांनी विशेष कौतुक केले. सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी श्री. स्वप्नील क्षीरसागर, श्री. मुकुंद मुणगेकर आणि महाविद्यालयातील सर्व सेवकवर्गाने प्रचंड सहकार्य व मेहनत घेतली हे विशेषत्वाने नमूद केले पाहिजे.




*डावीकडून : डॉ. अनिल काकोडकर, स्वप्नील क्षीरसागर, डॉ. उदयसिंह रौतेले, डॉ. अविनाश वाघमोडे आणि डॉ. लक्ष्मण फड*

# अभिनंदनीय पुस्तक प्रकाशन

'रिव्युव्ह फॉरेन्सिक मेडिसिन आणि टॉक्सिकॉलॉजी' हे पुस्तक बी.के.एल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक आणि या पुस्तकाचे लेखकद्वय डॉ. अविनाश वाघमोडे आणि डॉ. लक्ष्मण फड यांच्या अथक प्रयत्नाने प्रकाशित झाले आहे. या पुस्तकातील नावीन्यपूर्ण माहितीचा फायदा होतकरू वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नक्कीच होणार आहे असे उद्गार काढत वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी दोन्ही प्राध्यापकांचे विशेष कौतुक केले.



*डावीकडून : डॉ. लक्ष्मण फड , डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. अविनाश वाघमोडे*



*डावीकडून : डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. पल्लवी भट, श्री. अंकित कूड, आणि डॉ. अलका जाधव*

# डॉ. अलका जाधव यांची भेट

'लोकमान्य टिळक म्युनिसिपल मेडिकल कॉलेज'मधील माजी प्राध्यपिका आणि लहान मुलांच्या गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट, हेपॅटोलॉजिस्ट डॉ. अलका जाधव यांनी वालावलकर वैद्यकीय महाविद्यालय आणि किशोरी मुलींच्या डेरवण कोहार्ट ह्या उपक्रमाला भेट दिली. त्यानी कुपोषित मुलांचा पोषक आहार आणि त्याकरिता 'रेडी टू यूज फूड प्रॉडक्ट्स'चा वापर करून अनेक मुलांचे आरोग्य सुधारण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. ह्या संदर्भात कोकणातील मुला-मुलींचे पोषण कसे वाढवता येईल ह्याबद्दलचे मार्गदर्शन केले. त्याचा फायदा गरोदर माता आणि मुलींना निश्चित होणार आहे. डेरवण कोहार्ट ह्या किशोरवयीन मुलीच्या आरोग्यासाठीच्या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

# फिजिओथेरपीच्या पहिल्या बॅचचे घवघवीत यश !

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकच्या अंकित, २०१८ साली स्थापित केलेल्या 'एसव्हीजेसीटी'च्या 'बी.के.एल. वालावलकर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी'च्या पहिल्या बॅचच्या फिजिओथेरपी विषयाचे विद्यार्थी पदवी परीक्षेत घवघवीत यश मिळवून चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. तसेच कॉलेजची अर्थवी वाघोले हिने ७४.१२० गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम, आकाश घाडीगावकर ह्याने ७१.७५० गुण मिळवून द्वितीय तर दिव्या चिखलकर हिने ६८.५० गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकवला आहे. बी.के.ल. वालावलकर कॉलेजमधील सर्व सुविधा आणि प्रात्यक्षिकासाठी वालावलकर रुग्णालय असल्यामुळेच उत्तम शिक्षण मिळून यशस्वी झाल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी संस्थेचे आणि शिक्षकांचे आभार मानले. सर्व पहिल्या बॅचच्या विद्यार्थ्यांचे फिजिआथेरपी महाविद्यालययातर्फे हार्दिक अभिनंदन.



*फिजिओथेरपी पहिल्या बॅचचे यशस्वी विद्यार्थी*

# वालावलकर वैद्यकीय महाविद्यालयात स्वच्छ भारत दिवस

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून दोन ऑक्टोबर हा दिवस 'स्वच्छ भारत दिवस' म्हणून साजरा केला जातो. या वर्षी स्वच्छ भारत दिवस २०२३च्या निमित्ताने दिनांक १ ऑक्टोबर २०२३ रोजी देशभरात प्रत्येक गावात, शहरात व्यापक स्वरूपात 'एक तारीख – एक तास स्वच्छतेसाठी' अशी श्रमदानातून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

२०२३ ची थीम 'कचरामुक्त भारत' अशी होती. चिपळूण जिल्ह्यातील सर्व गावात गावकऱ्यांच्या सहभागातून श्रमदान करावयाची ठिकाणे प्रत्येक गावात निश्चित करण्यात आली, प्रत्येक गावात एक ऑक्टोबर रोजीची महाश्रमदान मोहीम यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थांनी एक दिवसातील एक तास आपल्या गावाच्या स्वच्छतेसाठी दिला व आपल्या गावात राबविण्यात येणाऱ्या महाश्रमदान मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपले गाव, गावाचा प्रत्येक परिसर स्वच्छ केला.

सदर श्रमदानासाठी भ.क.ल. वालावलकर वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी, इंटर्न्स आणि प्राध्यापक यांनी हिरिरीने भाग घेतला. श्रमदानासाठी उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी चिपळूण, तहसिलदार चिपळूण, प्रशासक तथा मुख्याधिकारी चिपळूण नगर परिषद, प्रशासकिय गटविकास अधिकारी चिपळूण, उपविभागीय वन अधिकारी कार्यालय, कृषी विभाग, महिला व बालकल्याण विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ, चिपळूण असे अनेक मान्यवर उपस्थित होते.

कम्युनिटी मेडिसिन विभागाचे प्राध्यापक डॉक्टर रविकिरण,



चिपळूण येथील 'कचरामुक्त भारत' अभियानातील सहभागी

डॉक्टर अमृता, तेजस, गोविद, अनघा, रोहन हे सर्व इंटर्न्स आणि तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर ज्योती यादव यांनी पुढाकार घेऊन विरेश्वर परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. या श्रमदान मोहिमेकरिता एकूण १९२० लोक सहभाग झाले होते. आणि चिपळूण शहरातील सुमारे ७ टन ५३५ किलो कचरा उचलण्यात आला. नगर परिषद कार्यालयामध्ये अभियानाची सांगता करण्यात आली.

स्वच्छता ही मानवी जीवनाचा अविभाज्य घटक असून, परिसरातील वाढत्या रोगराईपासून मुक्त होण्यासाठी सगळ्यांनी स्वतःपासून स्वच्छता करण्याची गरज आहे. वाढत्या रोगराईमुळे अनेक आजाराचा सामना करावा लागतो, त्यासाठी सर्वांनी स्वच्छता राखणे आवश्यक आहे अशी भावना व्यक्त करण्यात आली. स्वच्छतेबाबत लोकांमध्ये सजगता वाढली आहे.




'कचरामुक्त भारत' अभियानातील वालावलकर मेडिकल कॉलेजची सहभागी टीम

# डॉ. अनिल काकोडकर यांची ‘स्पेस लॅब’ आणि ‘अटल टिंकरिंग लॅब’ ला भेट





*‘अटल टिंकरिंग लॅब’मध्ये डॉ. काकोडकर, डॉ. नातू, श्री. बांठिया आदी शास्त्रीय सल्लागार समिती सदस्य तसेच श्री. अशोकराव जोशी आणि कर्मचारी वर्ग*

**डॉ. अनिल काकोडकर यांची विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप !**

पद्मविभूषण शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी दि. ०७ ऑक्टोबर २०२३ रोजी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट इंग्रजी माध्यम शाळेतील ‘स्पेस लॅब’ आणि ‘अटल टिंकरिंग लॅब’ ला भेट दिली.

‘आम्हा विद्यार्थ्यांना आकाश आणि अवकाशाचे गूढ जाणून घेण्याचे कुतूहल असते, अंतराळ विज्ञानाचा अभ्यास करण्याची आमच्यात आवड निर्माण व्हावी आणि भविष्यात आम्ही SVJCTच्या विद्यार्थ्यांपैकी Space Scientist व्हावे म्हणून आमच्या शाळेत ही स्पेस लॅब स्थापित करण्यात आली आहे,’ असे सांगून विद्यार्थिनींनी डॉ. अनिल काकोडकर आणि सर्व मान्यवरांचे स्पेस लॅबमध्ये स्वागत केले.

स्पेसलॅबमधील प्रत्येक खगोलशास्त्रीय प्रतिकृती व त्याच्या कार्याबद्दल इयत्ता आठवी व नववीतील विद्यार्थ्यांनी माहिती दिली. प्रतिकृतीशी संबंधित विचारलेल्या प्रश्नांना विद्यार्थ्यांनी समर्पक उत्तरे दिली तसेच ज्याचे उत्तर माहीत नाही त्याबद्दल अभ्यास करण्याची इच्छा व्यक्त केली. अटल टिंकरिंग लॅबमध्येही विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनांना वैज्ञानिक साधनांद्वारे सत्यात उतरविण्यासाठीचे प्रयत्न आपल्या विविध प्रयोगातून दाखविले.

डॉ. अनिल काकोडकर यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय स्तराच्या शास्त्रज्ञांना भेटण्याची, त्यांना आपले प्रकल्प सांगण्याची आणि त्यांच्याकडून मार्गदर्शन घेण्याची संधी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना लाभली. अंतराळविज्ञानासारखा जटिल व रहस्यमय विषय शाळेने लहान वयातील मुलांच्या शिक्षणासाठी उपलब्ध केला आहे याबद्दल डॉ. अनिल काकोडकर यांनी समाधान व्यक्त केले; तसेच मुलांना व शिक्षकांना अधिक मार्गदर्शन मिळेल यासाठी प्रयत्न करू अशी सहमती दर्शविली.

या वेळी त्यांच्यासोबत श्री. अशोकराव जोशी, श्री. जयंतकुमार बांठिया, डॉ. अरविंद नातू, डॉ. चंद्रशेखर गर्दे, डॉ. श्रीपाद बाणावली, श्री. विकासराव वालावलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# खगोलशास्त्र संशोधिका लीना बोकील यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




*नासा हनीवेलच्या स्पेस एज्युकेटर लीना बोकील*



*लीना बोकील विद्यार्थ्यांसमवेत स्पेस-लॅबमध्ये*



*लीना बोकील विद्यार्थ्यांसमवेत स्पेस-लॅबमध्ये*



*डावीकडून : डॉ. आनंद जोशी, प्रफुल्ल गोडबोले, श्री. अशोकराव जोशी, लीना बोकील, डॉ. श्रीरंग जोशी सौ. आसावरी ठाकूर, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. नीलम शिरसाट*

नासा हनीवेलच्या स्पेस एज्युकेटर लीना बोकील यांनी मंगळवार, दिनांक ०३ ऑक्टोबर २०२३ रोजी Astronomy and Space Technology या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आशियातील पहिले नोबेल पुरस्कार विजेते शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रमण हे आपले प्रेरणास्रोत असून विद्यार्थ्यांनी लहानपणापासूनच स्वतः प्रयोग करून शिकावे यासाठी सर सी. व्ही. रमण रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेन्टर पुण्यामध्ये सुरू केले असल्याचे त्यांनी सांगितले. आर्यभट्ट, भास्कराचार्य, वराहमिहीर, ब्रह्मगुप्त अशा भारतीय प्राचीन शास्त्रज्ञ आणि गणितज्ज्ञांनी दुर्बिणीशिवाय आकाशाची सखोल निरीक्षणे आणि जटिल गणिती ज्ञानाने अचूक खगोलशास्त्रीय अंदाज लावले. शून्यचा शोध आणि pi चे मूल्यनिर्धारण यात महान भारतीय गणिती आर्यभट्ट यांचे गणित आणि खगोलशास्त्रातील मोठे योगदान आहे. खगोलशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी गणित आवश्यक आहे असे लीना बोकील यांनी स्पष्ट केले.

लीना बोकील यांना त्यांच्या टीमसोबत नासाच्या Honeywell Space Educators' Program मध्ये सिम्युलेशनद्वारे प्री-कर्सर प्रशिक्षण देण्यात आले आहे जे वास्तविक अंतराळवीर अंतराळात जाण्यापूर्वी घेतात. नासाच्या अंतराळवीर प्रशिक्षण कार्यक्रमात शिक्षकांचा समावेश करण्याचे कारण म्हणजे प्रशिक्षित शिक्षक भावी पिढीला अंतराळविज्ञानाचा अभ्यास करण्यास प्रेरित करतील अशी माहिती त्यांनी दिली. प्रगत प्रशिक्षण घेणे, आंतरराष्ट्रीय अंतराळ परिषदेत सहभाग, तसेच अंतराळवीर, शास्त्रज्ञ, कॉस्मॉलॉजिस्ट यांना भेटण्यासाठी, अशा विविध कारणांसाठी त्यांनी NASA ला सहा वेळा भेट दिली आहे.

त्यांनी NASA आणि ISROद्वारे चालवलेल्या विविध अंतराळ मोहिमांची माहिती देऊन अंतरिक्षातून घेतलेली पृथ्वीची छायाचित्रे विद्यार्थ्यांना दाखवली. फक्त भारतातील इंजिनीरिंगचे शिक्षण घेत असलेल्या मुलींसाठी उपलब्ध असलेल्या Kalpana Chawla International Scholarship बद्दल त्यांनी माहिती देऊन गेली सात वर्षे सातत्याने अगदी लहान गावातील मुलींचीसुद्धा या शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे असे सांगितले. International Space University मध्ये शिक्षणाकरिता तसेच स्पेस टेक्नॉलॉजीमध्ये करिअर करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले आहे. त्यांचे बरेच विद्यार्थी जगभरातील अवकाश संस्थांमध्ये काम करत आहेत.

लीना बोकील यांनी अंतराळ अभियांत्रिकीमध्ये समाविष्ट असलेले विविध विषय आणि ते कसे मल्टिडिसिप्लिनरी आहेत हेदेखील स्पष्ट केले. भारतातील विविध अंतराळ अभियांत्रिकी तंत्रज्ञानाचे शिक्षण देणाऱ्या संस्थांची माहिती देऊन तिथे विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांशी संबंधित प्रकल्पांमध्ये उपग्रह बनवण्याची संधी मिळते असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. व्याख्यानाच्या शेवटी त्यांनी अंतराळवीर कल्पना चावला यांच्या बालपणापासून शेवटच्या अंतराळ मोहिमेपर्यंतची चित्रफीत दाखवून सर्वांना भावुक तर केलेच पण प्रेरणाही दिली.

डॉ. शंकरराव गोवारीकर यांना त्या गुरुस्थानी मानतात आणि त्यांना नील आर्मस्ट्राँग, बझ अल्ड्रिन, राकेश शर्मा, डॉ. जयंत नारळीकर आणि अनेक खगोलशास्त्रज्ञ, कॉस्मॉलॉजिस्ट यांना भेटण्याचा मान मिळाला आहे. ISROतील शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. प्रमोद काळे यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

# जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेतील यश



*मुख्याध्यापिका प्रज्ञा पारकर, शिक्षिका सोनाली जोशी, शाळा संचालिका शरयू यशवंतराव, वक्तृत्व स्पर्धेत सहभागी विद्यार्थिनी - अनुष्का सकपाळ, आकर्षा हेळेकर, रोज मारिया कुरसिंगल, स्वरूपा हेंबाडे, रिचा शेंबेकर, स्वराली पुरोहित, शिक्षिका प्राची गोखले, उच्च माध्यमिक विभाग प्रमुख कल्पेश जुवेकर, शिक्षक गुरुराज गर्दे*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट, इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, डेरवण, या प्रशालेने नुकत्याच रत्नागिरी येथे पार पडलेल्या कै. मृणाल हेगशेट्ये जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये माध्यमिक गट (मराठी माध्यम), माध्यमिक गट (इंग्रजी माध्यम) आणि कनिष्ठ महाविद्यालय गट अशा तीनही गटांमध्ये दोन विद्यार्थ्यांचा प्रत्येकी एक संघ पाठवून सहभाग घेतला. त्यामध्ये माध्यमिक गट - इंग्रजी माध्यम गटात इयत्ता दहावीतील विद्यार्थिनी रोज मारिया कुरिसिंगल हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. रोख रु. एक हजार, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तिपत्र असे तिच्या बक्षिसाचे स्वरूप होते. माध्यमिक गट मराठी विभागात इयत्ता दहावीतील स्वरूपा अंकुश हेंबाडे हिने रोख रु. सातशे पन्नास, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तिपत्र अशा स्वरूपाचे तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. तर कनिष्ठ महाविद्यालय गटामध्ये इयत्ता बारावीची विद्यार्थिनी रिचा रघुनाथ शेंबेकर हिने रोख रु. पाचशे आणि प्रमाणपत्र असे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले.

या सर्व विद्यार्थ्यांना शाळेतील इंग्रजी आणि मराठी विभागातील शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाले.

# व्यक्त होऊन मुक्त व्हा : मानसशास्त्रज्ञ प्रा. धनश्री भागवत

## जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा

जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, मानसोपचार विभाग आणि समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्युट, मानसशास्त्र विभाग यांच्या मार्फत निबंधलेखन, पोस्टर मेकिंग, रांगोळी इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या. या वर्षी जागतिक मानसिक आरोग्य संघटनेची थीम 'मानसिक आरोग्य हा प्रत्येकाचा मानवी हक्क आहे!' ही होती. त्यात नर्सिंग कॉलेज तसेच फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेतला.या कार्यक्रमात पोस्टर मेकिंग स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. नेताजी पाटील (रेडिओलॉजि विभाग) तर रांगोळी स्पर्धे




*प्रा. धनश्री भागवत दीप प्रज्वलन करीत असताना. डावीकडे सौ. शरयू यशवंतराव, डॉ. पद्माकुमारी व उजवीकडे डीन डॉ. मानसिंगराव घाटगे*




*डॉ. पद्माकुमारी प्रा. धनश्री भागवत यांना स्मृतिचिह्न देत असताना*

साठी मानसोपचारतज्ञ डॉ. के.एस. कुलकर्णी उपस्थित होते. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना स्मृती आणि एकाग्रता वाढविण्याच्या पध्दती या विषयावर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाची सुरवात प्रमुख पाहुणे मानसशास्त्रज्ञ प्रा. धनश्री भागवत आणि वालावलकर मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. मानसिंगराव घाटगे यांनी दीपप्रज्वलनाने केली. प्रा. धनश्री भागवत यांनी मानसिक आरोग्य हा प्रत्येकाचा मानवी हक्क आहे या विषयावर आपले विचार मांडले. त्यांनी मानसिक आजार म्हणजे नक्की काय? तसेच धर्म, लिंग, जात, रंग, आणि आर्थिक परिस्थिती या घटकांचा मानवी जडणघडण आणि मानसिक आरोग्यावर कशा पद्धतीने प्रभाव पडतो हे नमूद केले. सोबतच यातून बाहेर पडण्यासाठी आपण प्रत्येकाने स्व-आदर, भावनिक सुरक्षितता, आपल्या शरीराचे पोषण, व्यायाम, ध्यानधारणा हे घटक आपले मानसिक आरोग्य सदृढ राहण्यसाठी आचरणात आणले पाहिजेत यावर भर दिला.

यानंतर मानसशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्याचे महत्व सांगणारी लघुनाटिका सादर केली.

या सोबतच प्रमुख पाहुणे तसेच मान्यवर शिक्षण संचालिका शरयू यशवंतराव आणि मानसोपचारतज्ज्ञ डॉ. पद्माकुमारी यांच्या हस्ते विविध स्पर्धांमधील विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाची सांगता आभारप्रदर्शनाने करण्यात आली.



*डॉ. के. एस. कुलकर्णी (पुणे, मानसोपचारतज्ञ) रांगोळी स्पर्धेचे परीक्षण करताना*



*डॉ. नेताजी पाटील, पोस्टर कॉम्पिटिशनचे परीक्षण करताना*

# राज्यस्तरीय ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेत विक्रमी सहभाग

एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलात दिनांक ३० सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर या कालावधीत ३७ व्या महाराष्ट्र राज्य ज्युनिअर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धा संपन्न झाली. ३४ जिल्ह्यांमधून १२४६ खेळाडू, प्रशिक्षक, पालक, पंच असे २००० पेक्षा अधिकज जण उपस्थित होते. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी रत्नागिरी जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या अधिकृत वेबसाईटचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी उद्घाटक बाळासाहेब कदम, महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स असोसिएशनचे सरचिटणीस सतीश उचिल, उपाध्यक्ष संजय पाटील, राजू प्याटी, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, संघटनेचे सचिव संदीप तावडे, निलेश पाटकर आदि मान्यवर उपस्थित होते.

आपल्या मनोगतात सतीश उचील यांनी श्री विठ्ठलराव जोशी चॅरीटीज ट्रस्टने आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडा सुविधा अगदी तळागाळातील खेळाडूंसाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेचे आभार मानले. याचवेळी रत्नागिरी जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनची वेबसाईट तयार केल्याबद्दल संघटनेचे सर्व पदाधिकारी आणि तांत्रिक समितीचे सदस्य यांचे कौतुक केले.

मुंबई, कोल्हापूर, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, लातूर यासारख्या विविध जिल्ह्यांतून आलेल्या खेळाडूंनी दर्जेदार खेळाचे प्रदर्शन केले. दोन दिवस सकाळ आणि संध्याकाळच्या सत्रामध्ये पार पडलेल्या या राज्य स्पर्धेतून १४ व १६ वर्ष वयोगटातील मुले व मुलींचा महाराष्ट्राचा संघ निवडण्यात आला. हा संघ कोइम्बतुर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणार आहे.

स्पर्धेसाठी अनेक नामवंत प्रशिक्षक आपल्या संघांसह उपस्थित होते. त्या सर्वांनीच क्रीडासंकुलातील सर्वच सुविधा उत्तम असल्यामुळे स्पर्धा विनाअडथळा संपन्न झाली यासाठी आनंद व्यक्त केला. स्पर्धेनिमित्त आम्ही पालक अनेक ठिकाणी जाऊन स्पर्धा खेळतो, परंतु असे क्रीडासंकुल आमच्या पाल्यांच्या खेळातील कौशल्यासाठी प्रेरणादायी आहे, त्यामुळे संस्थेचे विशेष आभार, अशा भावना पालकांनी व्यक्त केल्या.

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com



















मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६३९ येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५,
उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०